पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

मा.शहर सुधारणा समिति

कार्यपत्रिका क्रमांक १२

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - २०/११/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २०/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र – सभापती
२) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा. सौ.साळुंखे सविता सुरेश
४) मा. तानाजी विठ्ठल खाडे
५) मा. उषा संजोग वाघेरे (पाटील)
६) मा. चारुशिला प्रभाकर कुटे

या शिवाय मा.गावडे – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.५) आरक्षण क्रमांक ५४८ मध्ये बदल करणेबाबत – मा.चारुशिला कुटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) विविध विकास कामांची पाहणी करणेकामी केरळ अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत – मा.चारुशिल कुटे, मा.सविता साळुंखे यांचा प्रस्ताव.

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक : मा. चारुशिला कुटे अनुमोदक : मा.तानाजी खाडे

सभा शुक्रवार दिनांक २२/११/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती – शुक्रवार दिनांक २२/११/२०१३ दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

मा.शहर सुधारणा समिति

कार्यपत्रिका क्रमांक १२

**सभावृत्तांत**

( दि. २०/११/२०१३ ची तहकूब सभा)

दिनांक - २२/११/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक २०/११/२०१३ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक २२/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. सुपे आशा रविंद्र- **सभापती**
२) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा. सौ.साळुंखे सविता सुरेश
४) मा. तानाजी विठ्ठल खाडे
५) मा. उषा संजोग वाघेरे (पाटील)
६) मा. चारुशिला प्रभाकर कुटे

या शिवाय मा.गावडे – नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

अ) दिनांक ०३/१०/२०१३, १७/१०/२०१३, २१/१०/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १७/१०/२०१३, २१/१०/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ०६/११/२०१३ व १२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ३४ विषय क्रमांक - १

दिनांक - २२/११/२०१३ विभाग – नगररचना व विकास

सूचक – मा.सविता साळुंखे अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३, दि.०४/०९/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे, मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत .....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक - २
दिनांक - २२/११/२०१३ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/१०/५९८/२०१३, दि.०७/१०/२०१३

विषय -पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे, मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे दि.१०/०९/२०१३ चे पत्र ....

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक - ३
दिनांक - २२/११/२०१३ विभाग – अ प्रभाग कार्यालय
सूचक – मा.उषा वाघेरे अनुमोदक – मा.चारुशिला कुटे
संदर्भ : १) मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/स्विस/११/कावि/३६६/२०१३, दि.१०/१०/२०१३
२) अ प्रभाग समिती ठराव क्र.१९२ दि.२३/०९/२०१३

विषय - मा. अ प्रभाग समिती ठराव क्र.१९२ दि.२३/०९/२०१३ बाबत...

विषय क्रमांक ३ चा विचार १८/१२/२०१३ च्या सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक - ४
दिनांक - २२/११/२०१३ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंखे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/०६/११००/२०१३, दि.०६/११/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील किंवा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील विविध प्रयोजनासाठी असलेल्या आरक्षणाखालील जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार संपादित करणे आवश्यक असून त्यासाठी उक्त अधिनियमांचे कलम १२६ मधील तरतूदीनुसार संपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच या संपादनासाठी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. केवळ स्थायी समितीच्या मंजूरीने जिल्हाधिकारी यांना सादर केलेले भूसंपादन प्रस्ताव वैध नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. असे निदेश शासनाने त्यांचेकडील पत्र क्र.टिपीएस-१८०७/५५९/प्र.क्र.६६७/०७/नवि-१३, दि.०७/०६/२००८ अन्वये दिलेले आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती ( मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा चौक - स.नं.२४२पै., २४४पै. ते २५१पै., २५७पै. ते २६३पै., २६५पै. व २६६ पै., २६९पै. ते २७२पै., २७६पै.ते २७८पै.) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करणेबाबतचा भूसंपादन प्रस्ताव फक्त मा.स्थायी समितीचे मंजुरीने

मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे. सदर ठिकाणच्या दि.२९/०१/२००८ रोजी घोषित झालेल्या निवाडयातील मिळकती सोडून सदर भूसंपादन प्रकरणातील स.नं.२७६पै. (सिसनं.२८९पै.), २७७पै. (सिसनं.२८८पै., २८७पै., २८६पै., २८५पै., २८४पै., २८३पै. व २८२पै.), स.नं.२७८पै. मिळकती आणि स.नं.२४२पै. (सिसनं.२८१पै.), स.नं.२४४पै. (सिसनं.७७३पै.), स.नं.२४७पै. (सिसनं.८४३पै.), स.नं.२४९पै. (सिसनं.८७३पै., १९३१पै., ९१०पै.), स.नं.२५९पै. (सिसनं.१९४०पै.), स.नं.२७२पै. (७८७पै.), स.नं.२५७पै. (सिसनं.१९३०पै.),स.नं. २६०पै. (सिसनं.२७३७पै., २७३८पै.) मधील क्षेत्र दुरुस्ती असलेल्या मिळकतीचा भूसंपादन प्रक्रिया प्रस्ताव क्र.नरवि/कावि/३अ/२/९०/२००४, दि.२०/०५/२००४ भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ४८ अन्वये प्रथमत: माघारी घेण्यास मान्यता देण्यात यावी.

सदरचा रस्ता हा बीआरटीएस रस्ता असून केंद्र सरकारचे जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत विकसित करणेत येत आहे. त्यामुळे मूळ विषयाप्रमाणे स.नं.२७६पै. (सिसनं.२८९पै.), २७७पै. (सिसनं.२८८पै., २८७पै., २८६पै., २८५पै., २८४पै., २८३पै. व २८२पै.), स.नं.२७८पै.या मिळकती आणि स.नं.२४२पै. (सिसनं.२८१पै.), स.नं.२४४पै. (सिसनं.७७३पै.), स.नं.२४७पै. (सिसनं.८४३पै.), स.नं.२४९पै. (सिसनं.८७३पै., १९३१पै., ९१०पै.), स.नं.२५९पै. (सिसनं.१९४०पै.), स.नं.२७२पै. (७८७पै.), स.नं.२५७पै. (सिसनं.१९३०पै.), स.नं.२६०पै. (सिसनं.२७३७पै., २७३८पै.) या मिळकतीसाठीच मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा चौक यामधील मिळकती ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीनुसार तातडीचे कलमासह भूसंपादन करणेचे प्रस्तावास नव्याने मान्यता मिळणेकरीता मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३८ विषय क्रमांक - ५

दिनांक - २२/११/२०१३

सूचक – मा.चारुशिला कुटे अनुमोदक – मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.चारुशिला कुटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -

आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. सदरचे आरक्षण पिंपरी चिंचवड मनपा नियंत्रण क्षेत्रात येत आहे. या आरक्षणासाठी पोहच रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. हा ९ मीटर रुंदीचा रस्ता शाळेसाठी अरुंद असून अपुरा आहे. तसेच या आरक्षणामध्ये रहिवासी घरे, चर्च असून सुमारे ८० टक्के क्षेत्र इमारतीने व्यापलेले आहे. या शाळेच्या लगतच्या परिसरामध्ये सेंट उर्सुला हायस्कूल, ट्रिनिटी विद्यालय, सरस्वती विद्यालय, म्हाळसाकांत विद्यालय तसेच पिं.चिं.मनपाचे आकुर्डी शाळा आहे. तरी या आरक्षणानुसार आता शाळेची आवश्यकता नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे आरक्षण क्र.५४८ नुसार शाळेसाठी आरक्षित जागा आरक्षणामधून वगळून रहिवासी निवासी विभागात समाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव

शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदरचा ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक - ६

दिनांक - २२/११/२०१३

सूचक – मा.चारुशिला कुटे अनुमोदक – मा.सविता साळुंखे

संदर्भ : मा.चारुशिला कुटे, मा.सविता साळुंखे यांचा प्रस्ताव -

मा.शहर सुधारणा समिती सभा विविध विकास कामांची पाहणी करणेकामी " केरळ " अभ्यास दौरा आयोजित करणेस व त्याकामी येणारे र.रु.५,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) चे अथवा प्रत्यक्ष येणारे खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता मिळणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ११११/२०१३
दिनांक - २६/११/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.